# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. २०-२२** **दिनांक २५/०१/२०२२**

**घरफोडीच्या गुन्हयांतील आरोपी अटक करुन मुद्देमाल जप्त करण्यात नवघर पोलीस ठाणेतील गुन्हे प्रकटीकरण पथकास यश**

तक्रारदार श्री. हर्ष महेश अग्रवाल, वय २३ वर्षे, यांचे हर्ष स्टिल इंडिया, नावाचे कंपनीचे गाळयाचे शटर दिनांक १५.०१.२०२२ रोजी २०.०० वा. ते दिनांक १७.०१.२०२२ रोजी सकाळी ०९.०० वा. चे दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयाने उचकटुन स्टिल भांडी तयार करण्याचा कच्चा माल (सर्कल) ने भरलेल्या ०१,५०,०००/- रु. किंमतीचा १५०० किलोग्रॅम वजनाच्या १५ ते २० गोणी असा माल चोरी केलेबाबत दिलेल्या तक्रारीवरुन नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I २८/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३८०,४५४, ४५७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

मिरा-भाईंदर परिसरात वाढते घरफोडी व इतर चोरीचे वाढते प्रमाणावर आळा घालण्यासाठी वरिष्ठांनी गुन्हयाची लवकरात लवकर उकल करण्याचे आदेश दिले होते.त्याअनुषंगाने गुन्हे प्रकटी करण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे ठिकाणावरील व इतर ठिकाणावरील प्राप्त सी.सी.टिव्ही कॅमेरांचे फुटेजची पाहणी केली. गुन्हयाचे तपासात पडताळलेल्या सी.सी.टिव्ही फुटेज मध्ये सदरचा गुन्हा २ अनोळखी आरोपीतांनी तिन चाकी २ सायकलींचा वापर करुन माल घरफोडी चोरी केला असल्याचे तपासात दिसुन आले. गुन्हयाचे तपासात प्राप्त सी.सी.टिव्ही फोटो इमेज व बातमीदारांमार्फत तपास करुन दोघापैकी आरोपी अझरुद्दीन अताऊल शेख, वय २४ वर्षे, यास अटक केली. अटक आरोपीताकडुन घरफोडी चोरी केलेली वरील प्रमाणे संपुर्ण मालमत्ता १०० टक्के हस्तगत करुन गुन्हयाची उकल करण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ.शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग, श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि/प्रकाश मासाळ (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/योगेश काळे, पोउनि/संदिप ओहोळ, पोना/ भुषण पाटील, पोशि/गणेश जावळे, पोशि/संदिप जाधव, पोशि/सुरज घुनावत, पोशि/विनोद जाधव यांनी केलेली आहे.